**आजचा शुभ विचार**

"नशिबावर विश्वास ठेवण्यापेक्षा स्वत:च्या ताकदीवर विश्वास ठेवा."आपण जे करतोय किंवा आपल्यात जी ताकद आहे ती ओळखायला शिका. नशिबावर निर्भर राहू नका.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर

RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!






मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-50 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Wednesday 25 June 2025 ▪ PAGES 6 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ५० ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ बुधवार, दि. २५ जुन २०२५ ▪ पाने ६ ▪ ₹ ४ रुपये


## भोळ्याभाबड्या वारकऱ्यांची फसवणूक!

### आषाढी वारीत विठ्ठल दर्शनाचे बनावट पास विक्रीचा प्रकार उघड

अभिजित कुलकर्णी
पुणे प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------



आषाढी एकादशीनिमित्त लाखो वारकरी पंढरपूरच्या दिशेने विठ्ठलनामाचा गजर करत वाटचाल करत असताना, काही फसवणूक करणाऱ्या टोळ्यांनी या भक्तिभावाला काळिमा फासणारा प्रकार घडवला आहे. थेट ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यात सहभागी असलेल्या काही भाविकांना मंदिर प्रवेशासाठी बनावट 'टोकन दर्शन' पास विकल्याची घटना समोर आली आहे. ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात चालत असलेल्या काही भाविकांना तुम्हाला देवाच्या टोकन दर्शनाचे पास १०० रुपयात देतो, असे सांगून सासवड परिसरात जुन्या पासावर हे नवीन डुप्लिकेट पास बनवून दिल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. मात्र जेव्हा हे भाविक मंगळवारी विठ्ठल मंदिरात दर्शनासाठी पोहोचले, तेव्हा प्रवेशद्वारावर स्कॅनिंग करताना ते पास बोगस असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर मंदिर प्रशासनाने तात्काळ कारवाई करत या सात भाविकांना बाजूला घेऊन चौकशी सुरू केली. मात्र, त्यांना हे पास कोणी तयार करून दिले? याबाबत माहिती सांगता आली नाही आले नाही. त्यानंतर प्रशासनाने या भाविकांना पोलिसांकडे पाठवले असून बोगस पास रॅकेट उघड करण्याचे आव्हान आता पोलिसांसमोर असणार आहे सध्या आषाढी वारीदरम्यान विठ्ठल दर्शनासाठी भाविकांना १० ते १२ तासांपर्यंत रांगेत थांबावे लागते, तर अधिकृत टोकन प्रणालीमुळे अर्ध्या तासात थेट दर्शनाचा लाभ मिळतो. याचाच गैरफायदा घेत काही भामटे बनावट पास बनवून फसवणूक करत आहेत. फसवणूक झालेल्या भाविकांनी सांगितले की, सासवडच्या दरम्यान त्यांना हे पास मिळाले. त्यामुळे हा प्रकार वारीच्या मार्गातच कुठे तरी घडत असल्याची शक्यता अधिक बळकट झाली आहे. मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी या प्रकरणी कडक भूमिका घेतली असून, यापुढे कुणीही असे पास विकताना आढळल्यास गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट केले आहे. तसेच त्यांनी सर्व भाविकांना अधिकृत संकेतस्थळावरूनच मोफत टोकन बुक करण्याचे आणि अशा बनावट पासांना बळी न पडण्याचे आवाहन केले आहे. आषाढी वारीचा पावन सोहळा जवळ येत असून, लाखो वारकरी पालख्या घेऊन पंढरीच्या दिशेने आपल्या लाडक्या विठुरायाच्या दर्शनासाठी मार्गस्थ झाले आहेत. या वारीच्या मार्गावर अनेक ठिकाणी उघडपणे मास-मटन विक्री करणारी दुकाने दिसून येतात. अगदी पंढरपूरमध्ये प्रवेश करतानाही विविध मार्गांवर अशी दुकाने आढळतात. गेल्या अनेक वर्षांपासून पालखी सोहळ्याचे प्रमुख आणि वारकरी संप्रदायातील संत मंडळी यात्रा कालावधीत पंढरपूर शहर तसेच पालखी मार्गावरील गावांमध्ये मास-मटन विक्री बंद ठेवावी, अशी मागणी करत होते. या वर्षी अखेर त्यांच्या मागणीला यश आले असून, आषाढी वारीच्या इतिहासात प्रथमच, यात्रेच्या कालावधीत सलग १० दिवसांसाठी पंढरपूरमध्ये मास-मटन विक्रीवर बंदी घालण्यात आल्याची घोषणा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केली आहे. ही बंदी लागू केल्यामुळे वारकरी संप्रदायात आनंदाची भावना व्यक्त केली जात असून, वारीचे पावित्र्य आणि भक्तिभाव जपण्यासाठी हा निर्णय महत्त्वपूर्ण ठरत आहे.


महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक स्वराज्यदूत वृत्तपत्रातर्फे राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन !

स्वराज्यदूत गौरव पुरस्कार



कर्तृत्वाचा सन्मान... स्वराज्याचा मान !!

महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी, सहकार, उद्योग, वैद्यकीय, पत्रकारिता (वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक / डिजीटल मीडिया), युवक, महिला, कला, साहित्य, क्रीडा, पर्यावरण, ग्रामविकास अशा विविध क्षेत्रांमध्ये

कौतुक तुमच्या कार्याचे

उल्लेखनिय कार्य करणाऱ्या संस्था व मान्यवर व्यक्तींच्या कार्याचा विशेष सन्मान करून भावी वाटचालीस तसेच उल्लेखनिय कार्य करण्यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून दैनिक स्वराज्यदूतने हा पुरस्कार आयोजित केलेला आहे.

दैनिक स्वराज्यदूत SWARAJYADOOT www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!
SWARAJYADOOT LIVE

दैनिक वृत्तपत्र
वृत्त वाहिनी

ऑगस्ट महिन्यात नाशिक येथे अतिशय भव्य-दिव्य समारंभात पुरस्कार वितरण नियोजित

प्रस्ताव पाठविण्यासंदर्भात सूचना

- संपूर्ण प्रस्ताव pdf स्वरुपात संगणकावर तयार केलेल्या स्वरुपात दि. ३१ जुलै २०२५ पर्यंत dainikswarajyadoot@gmail.com या इ-मेल वर पाठवायचा आहे.
- फक्त निवड झालेल्या व्यक्तींना प्रस्तावाची प्रिंट स्वरुपात (Hard copy) जमा करावी लागेल.
- प्रस्ताव पूर्णपणे मोफत स्वीकारले जातील. कोणताही आर्थिक मोबदला देण्याचा प्रयत्न करू नये. पुरस्कारासाठी कुणाशीही आर्थिक व्यवहार करू नये.
- दैनिक स्वराज्यदूत परिवाराशी संबंधित व्यक्ती, प्रतिनिधी यांना प्रस्ताव पाठवता येणार नाहीत.
- जिल्हा परिषद कर्मचारी, राज्य व केंद्र सरकारचे कर्मचारी यांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाही.

अधिक माहितीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
8446673677 / 8010232449


## ९०० कोटींच्या साकळाई योजनेस पंधरा दिवसांत मान्यता

### सुजय विखे पराभूत झालो तरी दिलेला शब्द पूर्ण करणार

अहिल्यानगर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------



लोकसभा निवडणुकीला मी पराभूत झालो तरी दिलेला शब्द, कामे पूर्ण करणार आहे. ९०० कोटी रुपयांच्या साकळाई योजनेसाठी येत्या पंधरा दिवसांत प्रशासकीय मान्यता मिळेल. ही कामे फक्त आम्हीच करू शकतो. परंतु ज्यांनी लोकसभेला व विधानसभेला शब्द दिला होता, तो सत्यात उतरवला का? दिलेला शब्द पूर्ण करण्याची ताकद फक्त विखे पाटील कुटुंबातच आहे. केवळ आश्वासनावर जगणाऱ्या पारनेर तालुक्याला आता प्रगती व विश्वासाचे राजकारण हवे आहे, असे सांगत माजी खासदार सुजय विखे यांनी खासदार नीलेश लंके यांच्यावर नाव न घेता टीका केली. नारायणगव्हाण (ता. पारनेर) येथील कुकडी कालव्याच्या अस्तरीकरणाच्या कामाची सुरुवात माजी खासदार सुजय विखे व आमदार काशिनाथ दाते यांच्या उपस्थितीत झाली. त्यावेळी डॉ. विखे बोलत होते. यावेळी विश्वनाथ कोरडे, सुजित झावरे, प्रशांत गायकवाड, अश्विनी थोरात, राहुल शिंदे, विक्रमसिंह कळमकर, गणेश शेळके आदी उपस्थित होते.सुजय विखे म्हणाले, लोकसभा निवडणुकीत जे काही घडले त्यातून आपल्याला शिकायला हवं. लोकांनी दिलेला निर्णय मान्य करून आम्ही पुढे चालत आहोत. पारनेरच्या जनतेने कोणत्याही आश्वासनाला बळी पडू नये. आम्ही फोटो काढणार नाही, व्हिडिओही काढणार नाही. पण तुम्हाला पाणी देणार. जातेगाव व पळवे गावाचा समावेश उपसा सिंचन योजनेमध्ये केला जाईल. योजनेचे सर्वेक्षणाचे काम लवकरच सुरू होईल.पारनेर तालुक्याच्या शेतकऱ्यांना पाण्यासाठी कोणाशी भांडण्याची गरज भासणार नाही. कारण जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे यांच्या माध्यमातून कुकडी व पठार भागातील उपसा सिंचन योजना मार्गी लावल्या जातील.

## भाकपची लोकशाही बळकटीकरणासाठी महत्वपूर्ण भूमिका

### राज्य अधिवेशन समारोपात डॉ. भालचंद्र कांगो यांचा दावा

**शैलेश रौंदळ**
**नाशिक प्रतिनिधी**
दैनिक स्वराज्यदूत

-----------------



भारतीय कम्युनिस्ट पक्षाने भारतीय लोकशाहीला बळकट करतानाच वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी ऐतिहासिक भूमिका बजावली असल्याचे पक्षाचे ज्येष्ठ नेते डॉ. भालचंद्र कांगो यांनी सांगितले.
येथे भाकपच्या २५ व्या राज्य अधिवेशनाच्या समारोपात डा ॅ. कांगो यांनी मार्गदर्शन केले. यूपीए-१ सरकारला बाह्य पाठिंबा देताना भाकपने समान किमान कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी महत्त्वाचे योगदान दिले. विशेषत: माहितीचा अधिकार कायदा, महात्मा गांधी रोजगार हमी योजना (मनरेगा), राष्ट्रीय आरोग्य अभियान, शेतकरी कर्जमाफी, आदिवासींना वनहक्क कायदा, अन्नसुरक्षा हे सर्व कायदे भाकप खासदारांमुळे संसदेत मंजूर होऊ शकल्याचे कांगो यांनी सांगितले. अन्यायकारक जुने कायदे रद्द करून नवा जमीन अधिग्रहण कायदा संमत करून शेतकऱ्यांना दिलासा देण्यात भाकपने महत्त्वाची भूमिका बजावली. १९५८ मध्येच भाकपने क्रांती ही लोकशाही मार्गानेच होईल, हे स्पष्ट केले होते. आजवर पक्षाने लोकशाही बळकट करण्यासाठी अविरत संघर्ष केला असल्याचे त्यांनी लक्षात आणून दिले.
तंत्रज्ञानाच्या नावाखाली माणसाचा विकास न करता केवळ नफ्याचा विचार करणाऱ्या भांडवली प्रवृत्तीवर टीका करताना कांगो यांनी, भांडवलशाही नफ्यासाठीच युद्धांचा आणि फॅसिस्टवादी प्रवृत्तींचा आधार घेत असल्याचे सांगितले. सध्याच्या युद्धजन्य परिस्थितीत शेअर बाजार उच्चांक गाठतात, यापेक्षा नफेखोरीचा क्रूर चेहरा काय असेल, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. एकीकडे पंतप्रधान सैनिकी वेशात फिरतात. दुसरीकडे ट्रम्प यांचा फोन आला की लगेच शस्त्रसंधी जाहीर करतात. ही भांडवलशाहीची गुलामीच आहे. संयुक्त महाराष्ट्रासाठी बलिदान दिलेल्या पक्षालाच आता पुन्हा मराठी भाषेच्या रक्षणासाठी लढा उभारावा लागणार आहे. लोकशाही, संविधान मूल्य आणि शेतकरी, कामगार यांना वाचविण्यासाठी लढावे लागेल, असे त्यांनी नमूद केले. अधिवेशन समारोप प्रसंगी नव्या कार्यकारिणीची निवड करण्यात आली. तसेच काही ठराव संमत करण्यात आले.

## 'ब्लॅक बॉक्सचे भारतातच विश्लेषण, अहमदाबाद

### विमान दुर्घटनेप्रकरणी केंद्रीय मंत्री नायडू यांची माहिती

विशेष वृत्तसेवा
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------




'अहमदाबाद येथील एअर इंडियाच्या विमान दुर्घटनेतील 'ब्लॅक बा ॅक्स' भारतातच असून, तपासणीसाठी अमेरिकेत पाठविला जाणार नाही,' असे केंद्रीय नागरी उड्डाणमंत्री किंजारापू राममोहन नायडू यांनी मंगळवारी येथे स्पष्ट केले. 'विमान अपघात तपासणी विभाग (एअरक्राफ्ट ॲक्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन ब्युरो – एएआयबी) ही संस्था कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाच्या साहाय्याने 'ब्लॅक बॉक्स'ची तपासणी करत आहे,' असे ते म्हणाले. भारतीय नागरी विमान वाहतूक मंत्रालय आणि फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री (एफआयसीसीआय) यांच्यातर्फे हेलिकॉप्टर आणि लघुविमान या विषयावरील परिषदेनंतर नायडू यांनी पत्रकारांशी संवाद साधला. या वेळी केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ या वेळी उपस्थित होते. नायडू म्हणाले, '१२ जून रोजी झालेल्या अहमदाबाद विमान दुर्घटनेत २४२ प्रवाशांचा मृत्यू झाला. विमानातील तांत्रिक बिघाडाची माहिती देणारा 'ब्लॅक बा ॅक्स' १३ जून रोजी सापडला. दुर्घटनेच्या सखोल तपासासाठी केंद्रीय स्तरावर स्वतंत्र समितीही तयार करण्यात आली आहे. 'ब्लॅक बा ॅक्स'चे नुकसान झाले आहे. 'एएआयबी' या बा ॅक्समधील आवश्यक माहितीची पुनर्प्राप्ती आणि विश्लेषण करता येईल किंवा नाही, याचा तपास करत आहे. ही तांत्रिक आणि संवेदनशील बाब आहे.'

संपादकीय

# अमेरिकेची युद्धात उडी, पुढे काय...?

इराण आणि इस्रायल यांच्या युद्धात अमेरिका उतरली आणि दुसऱ्या महायुद्धाचे स्मरण झाले. तेव्हाही जेव्हा अमेरिका मित्र राष्ट्रांमार्फत युद्धात उतरली नव्हती, तोपर्यंत मित्र राष्ट्रांचे काही खरे नव्हते. पण ज्या दिवशी अमेरिका मित्र राष्ट्रांच्या बाजूने युद्धात उतरली आणि जर्मनीला तिने देमाय धरणी ठाय करून सोडले. त्यानंतर मित्र राष्ट्रांनी युद्ध जिंकलेच आणि जर्मनीला त्याच्या आगळीकतेचे पारितोषिक देण्यात आले. पण आजची परिस्थिती अत्यंत वेगळी आहे. कारण आज इराण आणि इस्रायल यांच्यात युद्ध सुरू असले तरीही हे मानवता आणि मानवतेचे संरक्षण करू पाहणारे यांच्यातील युद्ध नाही, तर इराणचे अणू सामर्थ्य संपवण्यास सिद्ध झालेले इस्रायल आणि प्रचंड ताकदवान आणि त्या ताकदीवर जगाला नमवू पाहणारी अमेरिका यांच्यातील ही लढाई आहे.

इराणने अमेरिकेच्या हल्ल्यांना संयुक्त राष्ट्रसंघाच्या चार्टरचा भंग असे म्हटले आहे. पण इराणी हल्ल्यांची बाजू न घेताही असे म्हणता येईल की, या युद्धात हानी मात्र मानवतेची होणार आहे. होर्मुझची खाडी मार्ग बंद करण्याचा निर्णय इराणने घेतला आहे. तसे झाले तर अगोदर म्हटल्याप्रमाणे भारताला त्याचे परिणाम भोगावे लागणार आहेत. आता तर या युद्धाची व्याप्ती जास्त वाढली आहे. कारण होर्मुझचा मार्ग बंद झाला तर या मार्गाने येणारे पेट्रोल आणि वायू बंद होईल आणि त्यामुळे या दोन वस्तूंच्या किमती प्रचंड वाढतील. त्यामुळे अगोदरच नाजूक अवस्थेत असलेली भारताची अर्थव्यवस्था अधिकच संकटात सापडेल. हा तत्कालिक परिणाम झाला; परंतु खरा धोका आहे तो येत्या काळात शांततापूर्ण मार्गाने अण्वस्त्र प्रसार रोखण्याच्या प्रयत्नांना कायमचा सुरुंग लागेल. ते नुकसान जास्त मोठे आहे.

अमेरिकेच्या ताज्या हल्ल्यामुळे इराणच्या युरेनियम समृद्ध स्थळांचे तीन ठिकाणी मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे सारे जग अचंबित झाले आहे. इराणने जर होर्मुझची सामुद्रधुनी बंद करण्याचा निर्णय घेतला, तर संपूर्ण जागतिक अर्थव्यवस्थेसाठी तो धोक्याचा इशारा ठरेल. हा मार्ग बंद झाला, तर जगभरातील पेट्रोल पुरवठ्यावर त्याचा विपरित परिणाम होणार आहे आणि खामेनेई यांच्या सरकारने तसे करू नये म्हणून दबाव वाढवला तरीही आता अमेरिका त्यात उतरली असल्याने ते ऐकतील की नाही हा प्रश्न आहे. अनेक तज्ज्ञांनी असा विचार केला होता की इराण इतके टोकाचे पाऊल उचलणार नाही. पण आता अमेरिकेने युद्धात उडी घेतल्याने इराणला तसे करावे लागले, तर त्याचा दोष इराणबरोबरच अमेरिकेचाही असेल आणि त्यात भारतासारखी राष्ट्रे जी दोन्ही देशांत सामंजस्य राखून आहेत त्यांनाही यात जळावे लागेल. आता इराणचे कमकुवत सैन्य आणि इराणची अमेरिकेच्या तुलनेत सामर्थ्य नसलेली युद्धसामग्री अमेरिकेच्या हल्ल्याना कसे तोंड देते हा जगासमोरचा प्रश्न आहे. जितके हे युद्ध लांबेल तितके ते जगासाठी अधिक चिंतेचे ढग घेऊन येईल. कारण इराणकडे तेलाचा साठा आहे आणि तो पुरवण्याच्या मार्गाच्या दोन्हीही त्याच्याच हातात आहेत.

इराण प्रमाणबद्ध प्रतिसाद देईल अशी घोषणा इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अरघची यांनी केली असली तरीही प्रमाणबद्ध म्हणजे किती हे त्यांनी स्पष्ट केलेले नाही. त्यामुळे सारे जग संभ्रमात आहे. इराणचा अणू कार्यक्रम उद्ध्वस्त करण्याचा इस्रायलचा बेत आहे आणि अमेरिका हा कित्येक वर्षांपासून इस्रायलचा मित्र असल्याने त्याच्यावरील संकट हे अमेरिका स्वतःवरील संकट समजत असल्याने अमेरिका या युद्धात उतरली आहे. या दोघांचीच मैत्री कायमची आहे आणि इस्रायलने कित्येक प्रसंगी स्वतःभोवती अरब राष्ट्रे शत्रू राष्ट्रे म्हणून असतानाही अमेरिकेच्या मदतीने या अरब राष्ट्रांना पुरुन उरला आहे. त्यामुळे या संघर्षात इस्रायलचे सामर्थ्य इराणच्या तुलनेत कितीतरी जास्त आहे, पण होर्मुझची खाडी बंद केल्यामुळे जर भारताचे आणि उर्वरित जगाचे नुकसान झाले तर त्याला अमेरिका जबाबदार असेल असे काहीजण म्हणत आहेत.

आम्ही आधीच म्हटल्याप्रमाणे इराण आणि इस्रायल हे दोघेही भारताचे मित्र देश आहेत आणि पाकिस्तानविरोधातील संघर्षात इस्रायलने भारताला यापूर्वी चांगली साथ दिली आहे. त्यामुळे भारताने कोणतीही आततायी भूमिका न घेता युद्धापासून दोघांनीही दूर राहावे यासाठी प्रयत्न करावेत हाच भारतासाठी खरा प्रश्न राहील. अजून इराण आणि इस्रायल यांच्यातील संघर्षाने निर्णायक वळण घेतले नाही. पण तोपर्यंत जर यातून मार्ग काढला नाही तर दोन्ही बाजू निर्णायक युद्धात उतरतील आणि त्यात जगाचा पराभव होईल. कारण इराण नष्ट होईल पण तो संपूर्ण जगाला धडा शिकवून जाईल. त्यामुळे दोन्ही बाजूंनी संयम पाळण्याची आवश्यकता आहे. कारण युद्ध झाले तर कुणाचाच विजय होत नसतो, तर केवळ रणभूमीला रक्ताने स्नान घातले जाते. इराणने बराच काळ असा दावा केला होता की, त्यांच्याकडे अणू कार्यक्रम आहे, तो शांततापूर्ण आहे. पण ट्रम्प आणि अमेरिकेच्या तज्ज्ञांनी दाखवून दिले की त्यांच्याकडे अणुसाठा हा अणुबाॅम्ब तयार करण्यास पुरेसा आहे. तसे झाले तर काय अनर्थ होईल याचा विचारच न केलेला बरा. इस्रायलने इराणच्या अणुसाठ्याला बऱ्यापैकी नुकसान पोहोचवले आहे, असे बोलले जाते. तरीही त्यांच्याकडे अण्वस्त्रे आहेत ही बाब लपून राहिलेली नाही आणि जर या युद्धात ती माथेफिरूंच्या हाती लागली तर ते कुणाविरोधात वापरतील याचा काहीच भरोसा नाही. दुसरीकडे ट्रम्प यांनाही हा निर्णय धोकादायक आहे. कारण त्यांनी असे आश्वासन दिले होते की, आपण इराणला अणू कार्यक्रम मिळवू देणार नाही. पण त्यांची भूमिका ही वादात सापडली आहे. कारण इराणला अणू कार्यक्रमापासून दूर ठेवणे त्यांना शक्य होईल असे दिसत नाही. तसे झाले तर जगाचा विनाश अटळ आहे. असे म्हणतात की चौथे महायुद्ध जगात होणार नाही कारण तिसऱ्या महायुद्धात कुणी जिवंत राहणार नाही. आज जगावर तशी परिस्थिती ओढवली आहे.

# इराण-इजरायल युध्दात अमेरिकेने उडी घेतल्याने जगात अनेक संकटे निर्माण होणार!

आता सिद्ध झाले आहे की अमेरिका जगाला तिसऱ्या महायुद्धाकडे नेतांना दिसत आहे.कारण अमेरिका-इजरायल - इराण याची फक्त वर्चस्वाची लढाई आहे.परंतु यात मिडलिस्टमधील अनेक देश भरडले जात आहे.आपण युक्रेन-रशिया, इजरायल सोबतचे हमास-हिज्बुल्ला-हुती विद्रोही -इराण यांच्या संघर्ष व युद्ध पहाले.परंतु आपण ज्याला सुपर पॉवर म्हणतो तो अमेरिका तडजोड न करता इराणवर "ऑपरेशन मिडनाईट हॅमर"च्या माध्यमातून इराणवर अचानक अमेरिकेच्या बी-२ बॉम्बर विमानांनी इराणचे फॉर्डो उध्वस्त करण्यासाठी बंकर बस्टर्ड बॉम्ब टाकतो आणि तेही १३६०० किलो वजनाचा एक बॉम्ब असे १४ बॉम्ब टाकून इराणचे फोर्डो,नातान्झ आणि इस्फाहान या ३ आण्विक केंद्रांवर हल्ले करून उध्वस्त करतो याचाच अर्थ असा की जग विनाशाकडे जात असल्याचे दिसून येते.यामुळे आता जगातील अनेक राष्ट्र दोन गटात विभागल्या जाण्याची दाट शक्यता आहे आणि त्याची सुरुवात सुध्दा झाली आहे.अमेरिकेच्या कारवाईमुळे रशिया-चीन इराणकडून खुलेआम उतरू शकतो यालाही नाकारता येत नाही. अमेरिकेच्या हल्ल्यानंतर इराणने इस्त्रायलवर मोठ्या प्रमाणात क्षेपणास्त्रे डागण्यास सुरूवात केली आहे.अमेरिकेच्या इराणच्या अणुऊर्जा प्रकल्पांवर केलेल्या हल्ल्यामुळे जगात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.अमेरिकेच्या बी-२ बॉम्बर हल्ल्यानंतर इराण होर्मुझचा जलमार्ग बंद करून नाकाबंदी करण्याची दाट शक्यता आहे. होर्मूझ खाडीतून जगातील २० टक्के कच्च्या तेलाचा व्यापार होतो आणि हा मार्ग इराणने बंद केला तर याचा परिणाम भारतासह जगातील अनेक देशांवर पडु शकतो.कारण अमेरिकेने थेट अणुकेंद्रांवर हल्ला केल्याने इराणच्या तळपायाची आग मस्तकात गेली आहे त्यामुळे इराणने अखेरचे हुकुमी अस्त्र बाहेर काढले आहे.होर्मुझ बंद झाल्यास तेल पुरवठासाखळी विस्कळीत होईल व जागतिक बाजारपेठेत तेलाच्या किमती भडकू शकतात.अमेरिकेच्या हल्ल्यानंतर इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खोमेनेई व परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची यांनी अमेरिकेला हल्ल्याचा परिणाम भोगण्यास सज्ज रहाण्याचा इशारा दिला.कारण अमेरिकेने आमच्या अणुकेंद्रावर हल्ले करून संपूर्ण सिमा ओलांडल्या आहेत त्यामुळे आम्हालाही आमचे संरक्षण करण्याचा अधिकार आहे असा इशारा दिला.त्यामुळे या युध्दावर योग्य तोडगा निघाला नाही तर भयावह परिणाम होवू शकतात.कारण इराण- इस्त्रायल युध्द व युक्रेन-रशिया युद्ध सध्याच्या परिस्थितीत थांबने शक्य नाही.परंतु अमेरिकेच्या इराणवरील हल्ल्याने जगाला बेचैन केले असून तिसऱ्या महायुद्धाची घंटी वाजविल्याचे दिसून येते.डोनाल्ड ट्रम्पला वाटत असेल की हा अमेरिका, इस्त्रायल आणि जगासाठी ऐतिहासिक क्षण आहे परंतु ही बाब चुकीची आहे.कारण युद्धामुळे अजून पर्यंत कोणालाच फायदा झालेला नाही उलट नुकसानच झाले आहे आणि आता अमेरिकेच्या इराणवरील हल्याने जगात युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली असून याचा गंभीरपणे परिणाम जगातील संपूर्ण देशांना भोगावे लागतील.त्यामुळे संयुक्त राष्ट्रसंघाने पुढाकार घेऊन हे युध्द ताबडतोब थांबविले पाहिजे अन्यथा विनाश अटळ आहे.अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष "डोनाल्ड ट्रम्प जे बोलतात ते करीत नाही, आणि जे बोलत नाही ते करतात" त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत डोनाल्ड ट्रम्प हे विश्वास पात्र नेता रहाले नाही.अमेरिका सध्याच्या परिस्थितीत स्वार्थी व व्यापारी देश बनला आहे.अमेरिकेने स्वतःच्या स्वार्थासाठी दिनांक १४ जून २०२५ ला असीम मुनीरला अमेरिकि सशस्त्र दलाच्या २५० व्या वर्धापन दिनानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित केले होते व सोबतच डोनाल्ड ट्रम्प यांचा ७९ वा वाढदिवस सुध्दा होता या निमित्ताने असीम मुनीर कडून इराणच्या अनेक महत्त्वपूर्ण ठिकाणांची व गुप्त माहिती अवगत केली.याचाही फायदा अमेरिकेने अवश्य घेतला असावा आणि असीम मुनीर पाकिस्तानला परत गेल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांना २०२६ चा नोबेल पुरस्कार देण्याची मागणी मिडियाच्या माध्यमातून केली आणि दुसऱ्याच दिवशी म्हणजे दिनांक २२ जून २०२५ ला अमेरिकेने इराणवर बी-२ बॉम्बर विमानांनी अणू केंद्रांवर हल्ला केला.यामुळे सध्याच्या परिस्थितीत पाकिस्तान अत्यंत कठीण परिस्थितीत फसल्याचे दिसून येते.कारण पाकिस्तानचे मित्र राष्ट्र चीन,इराण आणि वर्ल्ड बँकेकडुन कर्ज घेण्यासाठी अमेरिकेशी दोस्ती.त्यामुळे आता पाकिस्तान घर का ना घाट का अशी परिस्थिती झाली आहे.डोनाल्ड ट्रम्प ने स्पष्ट शब्दात सांगितले आहे की "आम्ही दोस्ती कोणाही सोबत फुकट करीत नाही".त्यामुळे अमेरिकेला कल्पना होती की इराणचा खरा मित्र पाकिस्तान आहे त्यामुळे अमेरिकेने इराणविषयी संपूर्ण गुप्त माहिती पाकिस्तान कडून हस्तगत केल्याचे स्पष्ट दिसून येते.त्यामुळे इराणला खाईत लोटण्याचे केले असेल तर पाकिस्ताननेच केले आणि ही बाब इराणच्याही लक्षात आली आहे.त्यामुळे इराण व चीन पाकिस्तानला सुध्दा धडा शिकवु शकतो. या विनाशकारी महायुद्धाला संयुक्त राष्ट्रसंघाने,नाटो सह संपूर्ण देशांनी थांबवीण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे अन्यथा विनाश अटळ आहे.

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
नागपूर.

# आरोग्य स्वास्थ्यासाठी आणि मनाच्या शांतीसाठी योगासन आणि प्राणायाम करणे गरजेचे प्राचार्य डॉ लहू पवार

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-------------------





प्रत्येक व्यक्तीला आरोग्य स्वास्थ्यासाठी आणि मनाच्या शांतीसाठी योगासन आणि प्राणायाम करणे गरजेचे आहे. सध्याच्या धकाधकीच्या आणि धावपळीच्या जीवनात कोणतीही सबब न दाखवता व आळस न करता आपण दररोज एक तास योगासनासाठी दिला तर आपले आरोग्य आपणच सुदृढ ठेऊ शकतो असे मनोगत प्राचार्य डॉ. लहू पवार यांनी आंतरराष्ट्रीय योगदिनाच्या उदघाटन प्रसंगी व्यक्त केले.

पिंपळनेर एज्युकेशन सोसायटीचे कर्म. आ. मा. पाटील कला, वाणिज्य, व कै. अण्णासाहेब एन. के. पाटील विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग, राष्ट्रीय छात्रसेना विभाग, विद्यार्थी विकास विभाग, आयक्यूएसी विभाग आणि कर्म. आ. मा. पाटील माध्य. व उच्च माध्यमिक विद्यालय पिंपळनेर चा एनसीसी विभाग व संस्थेच्या विविध शाखांच्या संयुक्त विद्यमाने आज पिंपळनेर येथील दंमडकेश्वर लॉन्स येथे ११ व्या आंतरराष्ट्रीय योगदिनाचे उदघाटन संस्थेचे सचिव माजी प्राचार्य ए.एस. बिरारीस यांच्या शुभ हस्ते योगशिक्षक योगेश्वर नांद्रे यांचा सन्मान करून हस्ते झाले. प्राचार्य डॉ. पवार पुढे म्हणाले की केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध विभागांनी व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव, यांनी केलेल्या आव्हाना नुसार येथे उपस्थित सर्व जणांनी अतिशय चांगला प्रतिसाद या उपक्रमाला दिला, आणि स्वताच्या आरोग्य विषयक जागृतीला आपण सजग नागरिक म्हणून मोठ्या संख्येने उपस्थित राहून पाठिंबा दिला याचे कौतुक केले. पिंपळनेर एज्युकेशन सोसायटी या संस्थेचे सचिव कार्यक्रमाचे उदघाटक ए. एस. बिरारीस यांनी वयाच्या ८८ व्या वर्षी सर्व योगासने, प्राणायाम, व सूक्ष्म व्यायाम प्रकारात सहभागी होऊन, प्रत्येक योगप्रकाराबाबत महत्व सांगत तणाव विरहित जीवन जगण्याविषयी मार्गदर्शनही केले. याप्रसंगी योगशिक्षक म्हणून कला,वाणिज्य,विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राणिशास्त्र विभागाचे प्रा.योगेश्वर नांद्रे यांनी योगासन आणि प्राणायामाचा सराव करून घेतला व प्रत्येक प्राणायामांचे महत्व सांगून मार्गदर्शन केले. पिंपळनेर येथील पतंजलीच्या महिला चमूने संगीताच्या तालावर प्रात्यक्षिके करत मार्गदर्शन केले. आंतरराष्ट्रीय योग दिवसासाठी प्राचार्य, मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, उप मुख्याध्यापक, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर वृंद, विद्यार्थी, विद्यार्थीनी आणि पिंपळनेर शहरातील योगसाधक असे १८६ जणांनी उस्फूर्तपणे सहभाग घेतला. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. एल. जे. गवळी, सहा. कार्यक्रम अधिकारी, डॉ. एन. बी. सोनवणे, डॉ. संजय तोरवणे, आयक्युएसी संयोजक डॉ. संजय खोडके, राष्ट्रीय छत्रसेनेचे प्रा. डी. बी. जाधव, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. आनंद खरात, एन सी सी चे शिक्षक संदीप नांद्रे,वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, राष्ट्रीय छात्र सेनेचे, व राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व विद्यार्थी, प्राध्यापकेत्तर वृंद आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. एल. जे. गवळी यांनी केले आभार डॉ. संजय तोरणे यांनी मानले.

# 'नीट' चाचणी परीक्षेत कमी गुण मिळाल्याने मुख्याध्यापकाने घेतला पोटच्या लेकीचा जीव

## सांगली जिल्ह्यात हृदयद्रावक प्रकार; निर्दयी बापाला पोलिसांनी केली अटक

राजेंद्र यादव
सांगली जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
------------------------



सांगली जिल्ह्यात 'नीट'च्या सराव परीक्षेत कमी गुण मिळाल्यामुळे १६ वर्षीय मुलीचा तिच्या वडिलांच्या बेदम मारहाणीमुळे मृत्यू झाला आहे. या घटनेतील आरोपी वडील एका शाळेत मुख्याध्यापक आहेत. शनिवारी रात्री आटपाडी तालुक्यातील नेलकरंजी गावात ही घटना घडली असल्याचे एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितले.

या पोलीस अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, आरोपी धोंडिराम भोसले (४५) मुलीला 'नीट'च्या सराव परीक्षेत कमी गुण मिळाल्यामुळे नाराज होते. कमी गुण मिळाल्यामुळे आरोपी आणि पीडित विद्यार्थिनीमध्ये वाद झाला. त्यानंतर, आरोपीने लाकडी मुसळाने मारहाण केली. वडील मारहाण करत असताना पीडितेची आई आणि भाऊही घटनास्थळी उपस्थित होते, असे वृत्त पीटीआयने दिले आहे.

“ वडिलांनी मारहाण केल्यानंतर पीडित मुलीला सांगली येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, जिथे उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. शवविच्छेदन अहवालात असे दिसून आले आहे की, तिचा मृत्यू शरीरावर विविध ठिकाणी झालेल्या जखमांमुळे झाला आहे”, असे आटपाडी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक विनय बहिर यांनी सांगितले. मुलीच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून आरोपी वडिलाला अटक करण्यात आली आहे, असे पोलिसांनी सांगितल्याचे पीटीआयने म्हटले आहे.

याबाबत माहिती अशी, धोंडीराम भोसले हे नेलकरंजी गावातल माध्यमिक विद्यालयात मुख्याध्यापक आहेत. त्यांची मुलगी आटपाडी येथे बारावीमध्ये शिकत होती. आटपाडी येथील निवासी विद्यालयात ती वास्तव्याला होती. नुकतीच ती घरी आली होती. नीट चाचणी परीक्षेत तिला कमी गुण मिळाले होते. त्यामुळे संतापलेल्या भोसले यांनी घरातील जात्याच्या लाकडी खुंट्याने मुलीला मारहाण केली. या मारहाणीत तिच्या डोक्याला मार लागला होता. ती गंभीर पण शुद्धीवर होती. वडिलांनी तिला दवाखान्यात नेले नाही.

शनिवारी दुसऱ्या दिवशी सकाळी भोसले माध्यमिक विद्यालयात योगदिनाचा कार्यक्रम करून घरी आल्यावर मुलगी बेशुद्ध अवस्थेत दिसली. तिला उपचारासाठी दवाखान्यात नेण्यात आले. पण उपचारापूर्वीच तिचा मृत्यू झाला होता. शनिवारी रात्री मुलीचा अंत्यविधी झाला. त्यानंतर मुलीची आई प्रीती धोंडीराम भोसले यांनी काल फिर्याद दिली. आरोपीस अटक करण्यात आली आहे. न्यायालयाने आरोपीस बुधवारपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहे.

# मुंगसे येथील स्वामी विवेकानंद संस्थेचे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी महाविद्यालयाच्या वतीने आंतराष्ट्रीय योगा दिवस उत्साहात साजरा

सुनील म्हसदे
बागलाण तालुका प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
--------------------



मुंगसे (ता. मालेगाव) संयुक्त राष्ट्र संघाने निर्धारित केल्यानुसार २०१५ पासून २१ जुन रोजी आंतराष्ट्रीय योगा दिवस संपूर्ण जगभरात साजरा केला जातो. स्वामी विवेकानंद संस्थेचे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी महाविद्यालयाच्या वतीने महाविद्यालयातील ऑडीटोरियम रूम मध्ये साजरा करण्यात आला यावेळी स्वामी विवेकानंद संस्थेचे सेक्रेटरी आदरणीय श्री. राजेंद्र रामचंद्र सूर्यवंशी यांनी कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पुजनाने करण्यात आली सर्वाना आंतराष्ट्रीय योगा दिवसाच्या शुभेच्छा देत उत्तम आरोग्यासाठी नियमितपणे योगाभ्यास व प्राणायाम करावेत असे आवाहन केले त्यानंतर सामुहिक प्रार्थना घेऊन प्रत्यक्ष योगाभ्यासाला सुरुवात करण्यात आली स्वामी विवेकानंद संस्थेच्या अध्यक्षा सौ. संगीता राजेंद्र सूर्यवंशी स्वामी विवेकानंद संस्थेचे विश्वस्त श्री. सुजित सूर्यवंशी, सौ. रुचिता सूर्यवंशी, फार्मसी कॉलेजचे प्राचार्य एम. बी. निकम उपस्थित होते योग प्रशिक्षकांनी वेगवेगळ्या आसनांचा सराव करून दाखविला यात ताडासन , वृक्षासन धंचक्रासन, भुजंगासन वज्रासन करण्यात आले यामध्ये फार्मसी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सर्व विद्यार्थी सहभागी झाले यावेळी फार्मसी कॉलेजचे प्राचार्य एम. बी. निकम यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले कि अनेक रोग बरे करण्यासाठी आणि मानवाच्या सर्वांगीण कल्याणासाठी तसेच मन निरोगी ,तणावमुक्त आणि आनंदी राहण्यासाठी योगासन करणे खूप महत्वाचे आहे . मानसिक आणि आध्यत्मिक दृष्ट्याही चांगले जीवन प्राप्त करण्यास नक्कीच मदत करेल यावेळी त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना आपल्या भाषणात सांगितले सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्राध्यापक सौ दीपाली पाचपुते यांनी केले.यावेळी सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, बी. फार्मसी व डी. फार्मसी चे सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

# एक वर्षाची चिमुरडी अन भक्तीचा भयंकर धमाका!

## महाराष्ट्राच्या हृदयातून – दवडीपार गावची "हृदया अंजली" ठरली श्रद्धेची नवी शक्ती!

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
---------------------------

गोंदिया जिल्ह्याच्या गोरेगाव तालुक्यातलं एक छोटंसं गाव – दवडीपार. इथल्या एका वर्षाच्या चिमुकलीनं असं काही केलंय की संपूर्ण महाराष्ट्र थक्क आहे आणि सोशल मीडियावर धमाका सुरू आहे! हृदया अंजली गौरीशंकर पटले – अवघ्या १२ महिन्यांची ही पिटुकली, पण भक्तिभाव आणि निर्धाराचा एवढा पक्का निर्धार की बंबलेश्वरी मातेच्या २५ पायऱ्या ती स्वतः चढली... हो, हो! स्वतःच्या पावलांनी!

श्रद्धेचा शिखर – आणि हिचं जिद्दीचं पाऊल!

छत्तीसगडमधल्या डोंगरगडचं बंबलेश्वरी मंदिर – इथे ९९१ पायऱ्या आहेत. लाखो भक्त दरवर्षी इथं येतात. पण ही २५ पायऱ्यांची चढण चिमुकल्यांसाठी म्हणजे Everest! पण हृदया अंजलीसाठी नाही – ती आली, पाहिलं आणि श्रद्धेच्या पायऱ्या




तिने सर केल्या!

थक्क करणारं दृश्य!

मंदिर परिसरात जेव्हा ही चिमुरडी आपल्या छोट्या छोट्या पावलांनी पायऱ्या चढत होती, तेव्हा संपूर्ण भक्तगण स्तब्ध झाले! मोबाईल्स निघाले, कॅमेरे फिरले, आणि सोशल मीडियावर हा व्हिडिओ झालाय भन्नाट व्हायरल! लोक म्हणतात – "ही पायऱ्या नव्हत्या, श्रद्धेचं तेज होतं!"

आई-बाबांचं सांगणं:

"आम्ही ठरवलं होतं की बाळाला उचलून नेऊ... पण हिनं हट्ट केला – मी स्वतः चालणार! आणि पाहता पाहता आमच्या डोळ्यांसमोर हिने २५ पायऱ्या सर केल्या!"

प्रेरणादायी संदेश:

हृदया अंजलीचं हे कर्तृत्व म्हणजे भक्ती, बळ आणि बालहृदयाची ताकद याचं जिवंत उदाहरण! वय फक्त आकडं असतं... श्रद्धा आणि आत्मविश्वास खऱ्या शक्ती असतात – हे ह्या चिमुकलीनं जगाला दाखवून दिलं आहे.

हृदया अंजली – चिमुरडीचा झणझणीत भक्ती एल्गार! हे केवळ दर्शन नव्हतं... ही होती एक श्रद्धेची क्रांती! गोरेगाव तालुक्याची ही कन्या, आता ठरतेय महाराष्ट्रभर भक्तीची ब्रँड ॲम्बेसडर!

# पंतप्रधानांच्या अविरत कर्मयोगातून विकसित भारत साकार होणार खासदार डॉ. अजित गोपछेडे

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
-------------------



वैभवशाली संस्कृतीचा वारसा लाभलेल्या भारत देशाला एक सामर्थ्यशाली पंतप्रधान लाभले असुन मा. नरेंद्र मोदी यांच्यारूपांने अष्टपैलू व अविरत कर्मयोगी नेतृत्व देशाला लाभले आहे. सन २०१४ पासून ते आज तागायात दररोज ब्रह्ममुहूर्तापासून ते मध्यरात्रीपर्यत अविरत राष्ट्रसेवा करित आहेत. आज विकसित भारताचा अमृत काळ असुन सेवा, सुशासन, गरीब कल्याणाची ११ वर्ष पूर्ण झाली आहेत.संपूर्ण जगामध्ये भारताची एक विकसित व महासत्ताक राष्ट्र स्वरूपामध्ये विकास होत आहे याचे श्रेय मा.नरेंद्र मोदी साहेबांना जाते. आजपर्यंत असंख्य लोक कल्याणकारी योजनेच्या माध्यमातून भारतातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत विकास योजनांचे लाभ थेट त्यांच्या बैंक खात्यात जमा करून ग़रीबांचे कल्याण साधले जात आहे. सन २०४७ मध्ये भारत विश्वगुरू , महासत्ताक व विकसित राष्ट्र स्वरूपात निर्माण होणार असून त्याचे श्रेय निश्चितच नरेंद्र मोदी साहेबांना जाते असे प्रतिपादन राज्यसभा सदस्य खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी व्यक्त केले.ते भारतीय जनता पक्षाच्यावतीने आयोजित केलेल्या व्यावसायिक व बुद्धिवंत संमेलनामध्ये प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष श्री संतुकराव हंबर्डे होते तर व्यासपीठावर आ. जितेशजी अंतापूरकर (आमदार, देगलूर विधानसभा), अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर , डॉ. माधव पाटील उच्चेकर (जिल्हा सरचिटणीस तथा अभियान जिल्हा संयोजक) , अ.व्या.शिक्षण संस्था उपाध्यक्ष जनार्धन चिद्रावार, कार्यकारी मंडळ सदस्य सूर्यकांत नारलावार, नारायनराव मैलागीरे , चंद्रकांत नारलावार , विजय उंग्रतवार, प्राचार्य डॉ मोहन खताळ, माणिकराव लोहगावे, अनिल पा. खानापुरकर उपस्थित होते. प्रारंभी शहराध्यक्ष प्रशांत दासरवार यांनी प्रास्ताविक केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. बालाजी कत्तुरवार यांनी केले आभार प्रा. संग्राम पाटील यांनी मानले.याप्रसंगी विविध विकास योजनाच्या प्रदर्शनीचे उद्घाटन संतुकराव हंबर्डे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास जिल्हा उपाध्यक्ष अशोक साखरे , दीपक संगमकर यांच्यासह प्रतिष्टीत नागरिक , प्राध्यापक वकील, डॉक्टर, पत्रकार, व्यावसायिक, शेतकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# सखाराम वळवी यांना तातडीने नुकसान भरपाई द्या: वळफळीत दोन बैलांच्या मृत्युने शेतकरी हवालदिल

विनोद मोरे
साक्री शहर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------



नवापूर तालुक्यातील वळफळी येथे विजेच्या धक्क्याने दोन बैलांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने शेतकरी सखाराम देवाजी वळवी यांच्यावर मोठे संकट कोसळले आहे. शासनाने या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन, तातडीने पंचनामा करून सखाराम वळवी यांना नुकसान भरपाई द्यावी ,अशी मागणी जोर धरू लागली आहे. (काल ) सोमवारी सायंकाळच्या सुमारास घडलेल्या या घटनेमुळे वळफळी परिसरात शोक कळा पसरली आहे. सखाराम वळवी यांच्या शेती कामातील आधार असलेले दोन्ही बैल विजेच्या धक्क्याने मृत्यूमुखी पडल्याने त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे . बैलांशिवाय शेती करणे अत्यंत अवघड असल्याने, वळवी त्यांच्यासमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न उभा राहिला आहे . घटनेची माहिती मिळताच पशुसंवर्धन विभाग आणि महावितरणचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले होते . त्यांनी पाहणी करून पंचनामा केला असला तरी , आता प्रत्यक्ष मदतीची प्रतीक्षा आहे . शेतकरी आधीच नैसर्गिक आपत्ती आणि आर्थिक अडचणींना ग्रासलेला असताना , अशा अंनपेक्षित घटनांमुळे तो पूर्णपणे कोलमडून पडतो . त्यामुळे शासनाने संवेदनशीलता दाखवत लवकरात लवकर सखाराम वळवी यांना भरीव आर्थिक मदत जाहीर करावे अशी अपेक्षा आहे . या घटनेची सखोल चौकशी करून ,भविष्य असे अपघात टाळण्यासाठी महावितरणने जीर्ण झालेल्या वीजवाहिन्या आणि खांब दुरुस्त करावेत, अशी मागणीही ग्रामस्थांकडून होत आहे. शेतकऱ्यांच्या नुकसानीची भरपाई देणे हे शासनाचे कर्तव्य आहे, त्यामुळे सखाराम वाळवी यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत , असे आवाहन करण्यात येत आहे .

# नाफेडची कांदा खरेदी बंद करा!

## बिंदू शेठ शर्मा यांच्याकडे शेतकऱ्यांची मागणी

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
---------------



केंद्र सरकारने नाफेड मार्फत कांदा खरेदी चालू केली परंतु त्या कांदा खरेदी मागे शेतकऱ्यांना योग्य भाव मिळत नाही त्यामुळे शेतकरी वर्ग केंद्र सरकारवर प्रचंड नाराज झाला आहे. याउलट नाफेड खरेदी चालू नसताना शेतकऱ्यांना २००० पर्यंत भाव मिळत होते पण नाफेड खरेदी चालू करून शेतकऱ्यांच्या हातात फक्त बाराशे ते तेराशे रुपये पर्यंत कांद्याचे पैसे मिळत आहेत काढणीचा व लावणीचा खर्च सुद्धा निघत नाही. "अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे अगोदरच कंबरडे मोडले आहे आणि आता हे केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या जीवावर उठले आता जगावे की मरावे असा शेतकऱ्यांना प्रश्न पडला आहे". त्यासाठी आज बागलाण तालुक्यातील शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांचे कैवारी, शेतकऱ्यां च्या मदतीला धावून जाणारे शेतकरी मित्र बिंदू शेठ शर्मा यांच्याकडे आपले ग्रहाने मांडून शेतकऱ्यांच्या व्यथा सांगितल्या व नाफेडची कांदा खरेदी ही तात्काळ बंद करा अशी विनंती केली. जर का नाफेडला कांदा खरेदी करायचाच असेल तर प्रतिक्विंटल ३००० रुपये भाव द्यावा नाहीतर कांदा खरेदी बंद करावी अशी कांदा उत्पादक शेतकऱ्यांची मागणी आहे. आणि ही मागणी भाजपा किसान मोर्चा महामंत्री यांच्यामार्फत केंद्र सरकारकडे केली आहे तरी या शेतकऱ्यांच्या मागणीला योग्य न्याय द्यावा अशी शेतकऱ्यांनी बिंदू शेठ शर्मा यांना विनंती केली. या मागणीसाठी बागलाण तालुक्यातील शेतकरी श्री सुधा बापू पाटील, संजय विठ्ठल, गुड्डू पाटील, अनिरुद्ध पाटील, सुरेश राघव सोनवणे, कन्हो अहिरे, सुधाकर धर्मा पाटील अशा शेतकऱ्यांनी बिंदू शेठ शर्मा यांना मागणीचे निवेदन दिले.

# नाफेडची कांदा खरेदी बिन बुडाची.. खरेदीसाठी सरकार पुढे पण भाव मागे!

## सरकारला शेतकऱ्यांचा फायदा करता येत नसेल तर किमान नुकसान तरी करू नये. श्री भारत दिघोळे

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत-
------------------





कांदा उत्पादक शेतकऱ्यांना माफक आणि समाधानकारक दर मिळण्यासाठी आणि कांदा दरातील घसरण रोखण्यासाठी केंद्र सरकारने नाफेड व एनसीसीएफ मार्फत यावर्षी तीन लाख टन कांदा खरेदीचे नियोजन केले आहे. मात्र केंद्र सरकारच्या ग्राहक व्यवहार विभागाने रब्बी उन्हाळी कांद्याला क्विंटल ला १.४३५ रुपये दर जाहीर केला आहे. या उलट नाफेड कांदा खरेदी चालू नव्हती तेव्हा बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांना कांद्याला कमीत कमी १९०० ते २००० पर्यंत भाव मिळत होते. आता नाफेडची खरेदी चालू करून शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होत आहे. जर का सरकारला बंपर स्टॉप साठी लागणारा कांदा नाफेड आणि एनसीसीएफ या दोन्ही संस्थांकडून घेताना हा कांदा फक्त बाजार समिती मधून जिल्हा लिलावातूनच घ्यावा त्यासाठी किमान तीन हजार रुपये प्रतिक्विंटल दर द्यावा. सरकारला अशा पद्धतीने पारदर्शक कांदा खरेदी करणे शक्य नसेल तर सरकारने नाफेडची कांदा खरेदी कायमस्वरूपी बंद करावी. सरकारला शेतकऱ्यांचा फायदा करता येत नसेल तर किमान नुकसान तरी करू नये असे मत भारत दिघोळे यांनी व्यक्त केले.

# "स्वच्छ भारत मिशनची खुली थट्टा!"

## गोरेगाव पंचायत समितीच्या शौचालयांची दयनीय अवस्था – महिला, पुरुषांना दुर्गंधीचा त्रास!

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
-----------------------

गोरेगाव पंचायत समिती कार्यालयाच्या शौचालय, वॉशरूमची अवस्था इतकी भयावह झाली आहे की, तिथे पाऊल टाकणं म्हणजे आरोग्यावर घाला घालण्यासारखं आहे! महिला व पुरुष कर्मचारी अथवा भेट देणारे नागरिक जेव्हा या वॉशरूममध्ये जातात, तेव्हा घाणीची, सडलेल्या सांडपाण्याची तीव्र दुर्गंधी त्यांच्या नाकातोंडात जाते! पावसाळा डोक्यावर आलाय, पण स्वच्छतेचा पार बोजवारा उडालाय! शौचालयांमध्ये प्लास्टिकच्या रिकाम्या बाटल्या, इंग्लिश दारूच्या बाटल्या इतक्या खुलेआम फेकून ठेवलेल्या आहेत की, स्वच्छतेबाबत कोणतीही जबाबदारी घेतली जात नसल्याचं स्पष्ट दिसतं! आणि या सर्व वस्तू कॅमेऱ्यात कैद झाल्या आहेत! खंडविकास अधिकारी महेश गौतम, सभापती व उपसभापती यांना ठणकावून विचारलं पाहिजे – कुठे गेलं तुमचं प्रशासन? कुठे गेली जबाबदारी? गावपातळीवर स्वच्छतेसाठी लाखो रुपये खर्च होतात, सरपंच-ग्रामसेवकांना रोज "स्वच्छ भारत"चे धडे दिले जातात, पण पंचायत समितीच्या स्वतःच्या कार्यालयातच दुर्गंधी, घाण, आणि दारूबाजांची उघडपणे मस्ती सुरू आहे! दररोज येणारे पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य, अधिकारी यांना ह्या घाणीचा वास लागत नाही का? की ते डोळे झाकूनच प्रवेश करतात? स्वच्छ भारत मिशनचं गोडगाणं गाणाऱ्या अधिकाऱ्यांना आता प्रत्यक्ष स्वच्छतेच्या मैदानात उतरवण्याची गरज आहे! हीतर गावकऱ्यांनीच पुढाकार घेऊन ह्या "बदबुद्या" वॉशरूमवर टाळा लावायला हवा! जनतेचा सवाल – "जिथं सरकारचं कार्यालय अस्वच्छ, तिथं गाव कसं स्वच्छ राहणार?"

# मल्हारवाडी नवनिर्वाचित सरपंच सौ.अश्विणी खैरणार यांचा आ. सुहास कांदे कडून सत्कार

सोमनाथ घोगांणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
--------------------



नांदगाव तालूक्यातील मल्हारवाडी ग्रामपंचायत च्या नवनिर्वाचित सरपंच सौ.अश्विनीताई खैरनार यांचा शाल श्रीफळ व पुष्पहार देत आ.सुहास कांदे यांनी अभिनंदन केले तसेच पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलताना अण्णांनी मल्हारवाडी गावच्या विकासाकरिता माझी काहीही मदत लागल्यास मला सांगा तुमचा भाऊ सतत तुमच्या पाठीशी उभा आहे असा विश्वास दिला. याप्रसंगी ग्रामपंचायत सदस्य सरलाताई काकळीज , सौ.मीनाताई गोविंद , ग्रामस्थ वैशाली खैरनार, सौ.अनिता खैरनार, सौ.अरुणाताई गोरे, सौ.रोहिणीताई आहेर, सौ.मनीषाताई भवर, सौ.रूपालीताई जगताप, गौरी रोहम, मुकुंद खैरनार, संदीप खैरनार, अशोक पेंढारकर, वाल्मीक काकळीज, भूषण धूत, निलेश घोंगाणे ' अजय सुरसे, आदी उपस्थित होते.

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist- Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

# साहित्यिक सुहासजी टिपरे यांना जीवन गौरव पुरस्कार जाहीर

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------

मनुमानसी महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व महाविर इंटर नॅशनल नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येत असलेल्या वयाच्या पन्नास वर्षा पुढील विविध क्षेत्रात जसे की सामाजिक, अध्यात्मिक , सांप्रदाईक, आरोग्य, वृक्षसंवर्धनसेवा, पत्रकारिता, कवी लेखक संपादक कलावंत इ . .इ .क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यक्तिंचा जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करत असते. ह्या वर्षी २९ जुन २०२५ नाशिक येथे आयोजित करण्यात येणाऱ्या पुरस्कार वितरण सोहळ्यात कवी लेखक प्रबोधनकार श्री सुहासजी टिपरे यांच्या कार्याची दखल घेऊन साहित्य प्रबोधन सेवेसाठी जेष्ठ मान्यवरांच्या हस्ते जीवन गौरव




पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे . पुरस्काराचे स्वरूप शॉल , श्रीफळ, बुके, सन्मानपत्र, स्मृती चिन्ह , व मानाचा फेटा बांधून सुहाससरांना सन्मानित करण्यात येणार आहे. तशा आशयाचे निवडपत्र संस्थेच्या संस्थापिका मेघाताई शिंपी व इतर मान्यवरांच्या नामनिर्देश असलेले निवड पत्र नुकतेच त्यांना प्राप्त झाले आहे. सुहास टिपरे सर गंगागोदावरी पंचवटी क्षेत्री नाशिक येथे स्थाईक असून, साहित्यसेवा क्षेत्रात लोकप्रिय असून, उत्तम विचाराचे कवी लेखक म्हणून प्रसिद्ध असून त्यांच्या आई ह्या विषयावरचा लघू चिवनपट वजा पुस्तिका प्रसिद्ध असुन गिरणा गौरव प्रतिष्ठानचा स्मिता पाटील शब्द पेरा पुरस्कार प्राप्त झाला आहे. त्यांच्या कार्याची दखल घेता त्यांना अनेक संस्थानी सन्मानाने विविध पुरस्काराने सन्मानित केले आहे. शेकडो सन्मान पत्रांचे ते मानकरी ठरले आहेत. जीवन गौरव पुरस्कार जाहीर झाल्याने नाशिकच्या साहित्यिक परिवार व साहित्य क्षेत्रात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

# नहीं बूट नहीं मोजा, राब राबे कर्मचारी रेनकोट घाली साहेब, हुबा तठे अधिकारी

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-------------------

विकासासहित सेवा (!) देणाऱ्या धुळे महानगरपालिका आपल्या सफाई कामगारांना मात्र त्यांच्या हक्काच्या सुविधांपासून वंचित ठेवत आहे. सदर सफाई कामगार भर पावसात जिद्दीने नाले, गटारी साफ करतांना दिसत आहेत; पण त्यांच्या हक्कांचे जे पालिकेच्या नियमात बसणारे आहेत. गम बुट, सेफ्टी गॉगल, मास्क, डगरी सुट, केमीकल ग्लोज, रेनकोट यापासून गटार सफाई व ड्रेनेज कर्मचाऱ्यांना वंचित ठेवण्यात येत आहे. काहींना वाटप झाले पण याचे प्रमाण अत्यल्प आहे. मात्र त्यांचे शहरातील वरिष्ठ साहेब व्यक्तीगत विकत घेण्याची क्रय शक्ति असलेले स्वच्छता निरीक्षक 'रेनकोट' मध्ये दिसत





आहेत. हा भेदाभेद कशासाठी? भेदाभेद अमंगल असतो. पूर्वी पालिकेच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांना न्याय मिळावा म्हणून कम्युनिस्ट, काँग्रेस व समाजवाद्यांचे तिरंगी व लाल बावटे रस्त्यावर उतरत असत. आज दुर्दैवाने सर्वच बावटे इतिहास जमा झाले आहेत. या कर्मचाऱ्यांना कसा आणि कोण न्याय मिळवून देणार? शेवटी नरकाचे जीणे त्यांच्या वाट्याला आहेच. मला कौतुक करावेसे वाटते ते साक्री रोडवरील सुरभी कॉलनीतील पालिकेचे निवृत्त शिक्षक नथ्थू हांडू शिरसाळे गुरुजी, त्यांनी घंटागाडी थांबवून कर्मचाऱ्यांना मोजे दिले. समाजाने शिरसाळे गुरुजींसारखे उदार होऊन पुढे यावे व या



कर्मचाऱ्यांना दयाळु भावनेने सहकार्य करावे ही विनंती.

# शिरुर पोलिसांची जनतेच्या विश्वासास पात्र ठरलेली कामगिरी!

## चोरी गेलेले सोन्याचे दागिने दोन्ही महिलांना परत; पोलिसांच्या तत्परतेचे कौतुक

फिरोज सिकलकर
शिरूर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-----------------------

शिरूर शहरातील दोन वेगवेगळ्या सोन्या चोरीच्या गुन्ह्यांमध्ये शिरूर पोलिसांनी दाखवलेली तत्परता व गुन्हे शाखेचे कौशल्य यामुळे दोन्ही फिर्यादी महिलांना त्यांच्या हरवलेल्या मौल्यवान दागिन्यांची परतफेड करण्यात यश आले आहे. या कौतुकास्पद कामगिरीचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. पहिली घटना दिनांक ११ मे २०२५ रोजी घडली. फिर्यादी रूपाली अनिल काळे (वय ४०, रा. त्रिमूर्तीनगर, बारामती) यांचे सुमारे ३.९० लाख रुपये किमतीचे ६.१ तोळ्याचे सोन्याचे गंठण शिरूर बसस्थानक परिसरातून चोरीस गेले होते. या प्रकरणी आरोपी मनिषा विजय कसबे व शोभा शंकर दामोदर (दोघी रा. श्रीरामपूर) यांना अटक करून गुन्हा क्रमांक ३१७/२०२५ अंतर्गत कारवाई करण्यात आली. गुन्हे शाखेच्या



तपासातून सदर गंठण हस्तगत करण्यात आले. दुसऱ्या घटनेत, दिनांक २९ नोव्हेंबर २०२४ रोजी छबुबाई नारायण बनसोडे (रा. पाचर्णेमळा, शिरूर) यांची सोन्याची मनी मंगळसूत्र व कानातील दागिने मिळून सुमारे ७८,००० रुपये किंमतीचा मुद्देमाल हॉटेल जोगेश्वरीसमोर (सुरजनगर, शिरूर) ठिकाणी चोरीस गेले होते. आरोपींनी 'आजी' म्हणून बोलावून दिशाभूल करत हे दागिने चोरले होते. या प्रकरणात गुजरात व नागपूर येथील पाच आरोपींना अटक करून गुन्हा क्रमांक ९६५/२०२४ नोंदवण्यात आला. दोन्ही गुन्ह्यांमध्ये तांत्रिक विश्लेषण, सतर्क तपास आणि नियोजनबद्ध कार्यवाहीच्या जोरावर शिरूर पोलिसांनी मूळ मुद्देमाल हस्तगत केला. मा. न्यायालयाच्या आदेशानुसार दिनांक २४ जून २०२५ रोजी पोलीस निरीक्षक श्री. संदेश केंजळे यांच्या हस्ते दोन्ही फिर्यादींना त्यांच्या दागिन्यांचा मालकीहक्क बहाल करण्यात आला. या यशस्वी कारवाईबद्दल पोलीस निरीक्षक श्री. संदेश केंजळे, तसेच तपासात मोलाची भूमिका बजावणारे पोलीस उपनिरीक्षक श्री. शुभम चव्हाण व पोलीस हवालदार बापू मांगडे यांचे नागरिक व फिर्यादींनी विशेष कौतुक केले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मा. श्री. संदीपसिंह गील, अप्पर पोलीस अधीक्षक मा. श्री. रमेश चोपडे, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी मा. श्री. प्रशांत ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

शहरात पोलिसांविषयीचा विश्वास दृढ करणारी ही घटना म्हणजे गुन्हेगारांवर कडक कारवाई व सामान्य नागरिकांच्या सुरक्षेची हमी असल्याचे चित्र या कामगिरीतून स्पष्ट झाले आहे.

# साक्री नगराध्यक्ष जयश्री पवार विरुद्ध अविश्वासाचा ठराव मंजूर होणार. आमदार मंजुळाताई गावित व धुळे जिल्हा शिवसेनाप्रमुख डॉ. श्री तुळशीराम गावित.

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
---------------------

साक्री नगरपंचायत च्या नगराध्यक्ष ह्या नगरसेवकांना विश्वासात घेत नाही, विकास कामांच्या ठरावाला विरोध करतात, नियमित मीटिंग घेत नाही, नगरसेवकांनी आमदारांकडे सुचविलेल्या कामात फेरबदल करतात अशा अनेक तक्रारी शिवसेनेचे नगरसेवक विरोधी पक्षनेता




पंकज मराठे व त्यांचे अन्य सहकारी तसेच भाजपचे गटनेते बापूसाहेब गीते व त्यांचे सहकारी तसेच श्री सुरेश आबा पाटील यांचे समर्थक असलेले नगरसेवक यांनी आमदार सौ मंजुळाताई गावित व डॉक्टर तुळशीराम गावित जिल्हा शिवसेनाप्रमुख यांची भेट घेऊन नगराध्यक्षावर अविश्वास आणण्यासाठी आम्ही एकत्र आलेले आहोत असे सांगून मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे अविश्वासाचा ठराव दाखल केला. आणि या कामी शिवसेना जिल्हाप्रमुख डॉ. तुळशीराम गावित व आमदार सौ मंजुळाताई गावित यांनी त्यास मान्यता दिली. नगराध्यक्षा बद्दल दिनांक २५ जून २०२५रोजी होणारा ठराव निश्चित पारित होईल व नगरपंचायतीवर पुन्हा एकदा शिवसेना व भाजप चा झेंडा फडकवला जाईल असा विश्वास डॉक्टर तुळशीराम गावित यांनी व्यक्त केला आहे. यात नगराध्यक्षपदाची संधी उषाताई पवार यांना मिळण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

# उंभरे येथील हभप देवबा शेवाळे यांचा पिंपळनेर तालुका पत्रकार संघातर्फे सत्कार

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-------------------

उंभरे येथील सामाजिक कार्यकर्ते माजी सरपंच व ह भ प कृष्णाजी माऊली यांचे शिष्य व काटवान परिसरात वारकरी संप्रदायाची धुरा गावोगावी पोहोचवणारे त्यासाठी अहोरात्र मेहनत घेणारे ह .भ .प .देवबा एकनाथ शेवाळे यांना नुकताच धुळे येथे कांहन्देश वारकरी सांप्रदाया तर्फे धुळ्याचे आमदार अनुप अग्रवाल, भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र राज्य अध्यात्मिक आघाडीचे ह .भ. प .तुषार भोसले यांच्या हस्ते खानदेश रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला उंभरे गावात ज्यांनी वारकरी संप्रदायात साठी मोलाचे मार्गदर्शन केले व करीत



आहेत त्या कजवाडेकर महंत अनंता महाराज यांच्या मार्गदर्शनाने हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला या निमित्ताने का आठवण परिसरातील वारकरी संप्रदाय निश्चितच वाढेल असा विश्वास व्यक्त होत आहे .त्यानिमित्ताने उंभरे गावकऱ्यांतर्फे त्यांचा राम मंदिर येथे नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी ह भ प महंत अनंता महाराज यांनी देवबा अण्णांच्या कार्याचा गुणगौरव केला व त्यांनी आजपर्यंत जे कार्य केलं त्या कार्याची पोचपावती म्हणून त्यांना हा पुरस्कार देण्यात आला असे सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल अहिरे यांनी केले यावेळी गावातील ज्येष्ठ नागरिक तरुण व महिला मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते .पिंपळनेर तालुका पत्रकार संघातर्फे ही त्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला पिंपळनेर पत्रकार संघाचे अध्यक्ष सुभाष जगताप ,कार्याध्यक्ष प्रा. शिवप्रसाद शेवाळे ,इलेक्ट्रॉनिक मीडिया प्रभारी अनिल बोराडे तसेच उत्तमराव पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य व भारतीय किसान संघाचे सहमंत्री डॉ. सुरेश अहिरे उपस्थित होते. यावेळी बोलताना प्रा. डॉ. सुरेश अहिरे यांनी देवबा अण्णा यांनी केलेले सामाजिक कार्य व वारकरी संप्रदायासाठी केलेले कार्य युवकांना अशाप्रकारे प्रेरणादायी आहे हे सांगताना अण्णा सारखे व्यक्तिमत्व या परिसरात असल्यामुळे वारकरी संप्रदाय टिकून आहे त्यांना मिळालेला हा पुरस्कार खरोखरच त्यांच्यासाठी प्रेरणादायी आहे असे सांगितले. यावेळी ह भ प माधवराव शेवाळे, गंगाधर शेवाळे ,देविदास शेवाळे, भाऊसाहेब अहिरे , दगा ठाकरे, चिंतामण बापू उपस्थित होते.

# दहिवेलला अजून एक राष्ट्रीयकृत बँकेची मागणी

## सामाजिक कार्यकर्त्यांनी खासदार श्री गोवाल पाडवी यांना दिले निवेदन

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-----------------------

दहिवेल तालुका साक्री जिल्हा धुळे येथे राष्ट्रीयकृत एकच बँक शाखा असल्यामुळे दहिवेल व दहिवेल परिसरातील नागरिकांना शेतकरी बांधवांना व व्यावसायिकांना आर्थिक व्यवहाराच्या समस्या तसेच शासन स्तरावरून येत असलेल्या योजनांचा लाभ घेताना बँकेत तात्काळत उभे राहावे लागत त्याच्यातच बँकेचे सर्वर डाऊन वर खातेदारांचे वेळोवेळी काम न झाल्यामुळे तसेच वेळोवेळी बँकेत खातेदारांचे पैसे घेणे असून देखील बँकेकडून खातेदारांना पैसे वेळेवर मिळत नाही. त्यासाठी आज दहिवेलसह दहिवेल परिसरातील एक शिष्ट



मंडळ नंदुरबार लोकसभेचे खासदार यांच्याकडे गेले. त्यात दहिवेल चे उपसरपंच नंदकिशोर महाले तसेच पंचायत समिती दहिवेल गटातील पंचायत समिती सदस्य संगीता गणेश गावित तसेच सामाजिक कार्यकर्ते गणेश गावित तसेच सातारपाडा येथील सामाजिक कार्यकर्ते डॉक्टर अनिल पवार व दहिवेल येथील सामाजिक कार्यकर्ते श्री कन्हैया लाल माळी यांनी संयुक्तपणे ही बाब नंदुरबार लोकसभेचे खासदार एड.श्री गोवाल पाडवी यांच्या निदर्शनास आणून दिली व लेखी निवेदन दिले. खासदार साहेबांनी याची तात्काळ दखल घेत धुळे येथील कार्यालयाशी संपर्क साधत दहिवेलला नवीन मध्यवर्ती डाक घर निर्मित करून तिथं नागरिकांचा आर्थिक व्यवहार सुरळीत होण्यासाठी उपाययोजना करावी. असे श्री खासदार गोवाल पाडवी यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना सूचना केल्या. दहिवेल येथील डाग घरातील खातेधारक यांना देखील वेळोवेळी साक्रीला जावे लागते ही होणारी दैनंदिन धावपळ लक्षात घेता दहिवेल येथे मध्यवर्ती कार्यालय सुरू करण्याबाबत माननीय खासदार साहेबांनी धुळे येथील व्यवस्थापकांना पत्र लिहिलं व पत्र दिल्यावर त्यांना दूरध्वनीवरून संपर्क साधला त्याबाबत डाग विभागाचे चौधरी यांनी दहिवलीतील उपसरपंच व ग्रामपंचायत अधिकारी यांच्याशी संपर्क साधून लवकरच मध्यवर्ती कार्यालयाची निर्मिती होईल दहिवेल येथील नागरिकांची व दहिवेल परिसरातील नागरिकांची गैरसोय लवकरच दूर होईल असे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी व खासदार श्री गोवाल पाडवी यांनी आश्वासित केले.

# प्रधानमंत्री धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियान अंतर्गत किनवट पंचायत समिती येथे कार्यशाळा संपन्न

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
-------------------

नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या मार्गदर्शनाखाली, सहायक जिल्हाधिकारी जेनित चंद्रा दोन्तुला, उप मुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत श्रीमती मंजुषा कापसे, ज्ञानेश्वर टाकरस गटविकास अधिकारी किनवट, प्रदीप नाईक सहाय्यक प्रकल्प अधिकारी, रामेश्वर मुंडे तहसीलदार किनवट यांच्या



प्रमुख उपस्थितीत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेसाठी किनवट, माहुर, हिमायतनगर, भोकर, हदगाव, उमरी, धर्माबाद, मुखेड, मुदखेड, येथील तहसिलदार, गटविकास, ग्रामपंचायत अधिकारी, महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी यांना प्रशिक्षण देण्यात आले यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी या अभियानाबाबत सविस्तर मार्गदर्शन करताना सर्व जनजाती कुटुंबांचे ऑनलाईन सर्वेक्षण तात्काळ सुरू करुन विविध योजनेच्या माध्यमातून पात्र लाभार्थी यांना लाभ देण्यासाठी व विविध प्रकारचे दाखले/प्रमाणपत्रे देण्यासाठी आदेशीत केले. आदिवासी बांधवांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी सामाजिक भावनेतून काम करण्यासाठी अधिकारी कर्मचारी यांना आव्हान केले.तर यावेळी सहाय्यक जिल्हाधिकारी जेनित चंद्रा दोन्तुला यांनी या अभियानाबाबात मार्गदर्शन केले.कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी विस्तार अधिकारी वसंत वाघमारे , कैलास गायकवाड, राजेश मॅकलवार यांनी परीश्रम घेतले.